1823
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ५८९
REFBK-0002224

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५८१.

नं. १

# राजकारणाची उजळणी.

लेखक

**महादेव राजाराम बोडस,**

एम्. ए. एलएल्. बी.

२२२४
REFBK-0002224

# राजकारणाची उजळणी.

पुराणमित्येव न साधु सर्वं ।
न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ॥
सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजंते ।
मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥ कालिदास

"It is especially adding insult to injury to make me say that I am ready to sacrifice my conscience to a Congress mandate and recommend all to go and do likewise".

Arabindo Ghose's Letter to his spiritual agent, Motilal Ray.

रामानुजपंथाचे आद्यसंस्थापक यामुनाचार्य एके ठिकाणीं ह्मणतातः—

"वयमश्रद्दधानाः स्मो ये युक्तिं प्रथिया महे." ×

---

× यामुनाचार्यांचें प्रसिद्ध नांव अलवंदार होतें. त्यांच्या 'सिद्धित्रय' नामक ग्रंथांत संपूर्ण श्लोक आहे तो असा हंत ब्रह्मोपदे शोड यं श्रद्दधानेषु शोभते । वयगमश्रद्दधानाः स्मो ये युक्तिं प्राथियामहे ॥

–ह्मणजे 'श्रद्धाप्रधान बुद्धीचीं माणसें दुसऱ्याच्या उपदेशानें वागतात, पण दुसऱ्याची अधभक्ति न करणारे आह्मी युक्तिवादाचा आश्रय करतों.' अंधभक्ति व चिकित्सकबुद्धि या दोन भिन्न प्रवृत्ति सर्व समाजांत आढळून येतात; आणि समाजाच्या क्रांतिकाळीं त्या विशेष प्रज्वलित होतात. राजकारणांत वेळोवेळीं दिसून येणारे तट बहुधा याच परस्परविरोधी प्रवृत्तींचे द्योतक असतात एकादा असामान्य पुढारी विशिष्ट मताचा प्रसार करून अनुयायी, भक्त व चहाते गोळा करतो व मग त्याचे अंधभक्त परबुद्धि असल्यानें त्याचेंच मत कवटाळून बसतात. दुसरा पुढारी दुसरें मत प्रचलित करतो, व मग दोन्ही मतांची स्पर्धा सुरू होऊन दोन तट उत्पन्न होतात. समुद्राच्या लाटांनीं जशी भरती वाढते, तसें मतमतांतरांच्या स्पर्धेनें देशाचें राजकारण पुढें सरकतें. केवळ अंधभक्तीनें विशिष्ट मताचें व पक्षाचें दृढीकरण होतें, पण चिकित्साबुद्धीची कसोटी घातल्या शिवाय त्या मतांचें शुद्धिकरण व दुरुस्तीही होत नाहीं. कालिदासानें ह्मटल्याप्रमाणें, संत—ह्मणजे शहाणे लोक–जुनें किंवा नवें कोणतेंही मत जसेंचें तसें न घेतां, परीक्षा

करून प्राह्यांश तेवढाच स्वीकारतात, आणि मूर्ख लोक दुसऱ्यांचें शेंपूट धरून चालतात. अंधश्रद्धा आणि विचार स्वातंत्र्य या दोन प्रवृत्ति भिन्न माणसांत भिन्न प्रमाणानें आढळत असल्यामुळेंच बहुधा व्यवहारांतील सर्व मत-भेद आणि मतविरोध उत्पन्न होतात. थोड्या प्रमाणांत हे दोन्ही गुण समाजाच्या प्रगतीला अत्यंत आवश्यक व साहाय्यकारी आहेत. कारण एकामुळें पूर्व परंपरा कायम राहते, व दुसऱ्यामुळें सुधारणा होऊन पुढें पाऊल पडतें; पण अतिरेक झाला असतां दोन्ही हानिकारक होतात. अंधश्रद्धेचें पर्यवसान बौद्धिक गुलामगिरींत होतें व फाजील विचारस्वातंत्र्यानें बंधखोरपणा वाढतो. नवीन विचारांनीं समाजांत खळबळ उडाली असतां या दोन्ही प्रवृत्ति उद्दीपित होतात. सामाजिक व धार्मिक बाबतींत सनातनी व सुधारक पक्ष निर्माण होतात, आणि राज-कारणांत मवाळ आणि जहाल रट पडतात. हे दोन्ही तटबाले एकमेकांवर अप्रामाणिकपणाचा व मूर्खपणाचा आरोप करीत असतात; पण वस्तुतः हे दोघेही सारखेच मूर्ख किंवा शहाणे असून केवळ स्वभाव भेदानें परस्पर विरोधी झालेले असतात. “ गुणकर्मविभागशः ” हा

प्राचीन चातुर्वर्ण्यविभागाचा नियम हल्लींच्या सामाजिक व राजकीय तटांना अक्षरशः लागू पडतो. स्थिरबुद्धि, थंडप्रकृति व अल्पसंतुष्ट लोक सामाजिक बाबतींत पुराणाभिमानी व राजकारणांत मवाळ आणि नेमस्त होतात; पण चंचल, चलाख, महत्वाकांक्षी, उलाढाली व उपद्व्यापी लोक सामाजिक सुधारक अथवा राष्ट्रिय जहाल होतात. अनेक वेळां एका बाबतींतील जहाल दुसऱ्या विषयांत नेमस्त आढळतात हें खरें, पण त्याचें कारण अशा लोकांचें अन्य कर्तृत्व एका विषयांत खलास झाल्यानें दुसऱ्या विषयांत ते अकिंचित्कर होतात; आणि कांहीं लोक एकाच चळवळींत तल्लीन झाल्यानें मुद्दाम दुसऱ्या बाबतींत उदासीन राहतात. तात्पर्य, तटस्थ वृत्तीनें सामाजिक व राजकीय पक्षांचे व उपपक्षाचें पृथःकरण करूं लागलें असतां ती एक मानसशास्त्राचीच शाखा आहे, असें आढळून येईल. वस्तुतः कोणी कोणाला जहाल किंवा मवाळ म्हटलें तर रागावण्याचें मुळींच कारण नाहीं. पुष्कळदां असले आरोप काल्पनिक व खोटे असतात आणि खरे असले तरी ईश्वरनिर्मित स्वभावामुळें प्राप्त झालेले असल्यामुळें त्याचा हर्षविवाद कां

स. नि. ३



मानावा ? मनुष्याच्या बुद्धीपेक्षां स्वाभावामुळेंच त्यांच्या आचार विचारांना अधिक वळण लागतें हें तत्व सर्वांना एकदां उमजलें, ह्मणजे धार्मिक, सामाजिक व राजकीय वादविवादांतील कठोरपणा पुष्कळ कमी होईल यांत शंका नाहीं.

राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक पक्ष स्वभाववैचित्र्यामुळे उत्पन्न होतात हें जसें खरें, तसेंच प्रथम बनलेल्या पक्षांचे आंत आणखी उपपक्ष, पोटभेद अवांतर तट आणि मतमतांतें उपस्थित होतात, असें ही आपण पाहतों. एकाद्या अलौकिक पुरुषाच्या कर्तृत्वानें नवीन पक्ष स्थापन झाले ह्मणजे त्यांत अनेक प्रकारच भिन्न स्वभावाचे व नानाविध हेतूंनी प्रेरित झालेले लोक सामील होतात. या नवीन पक्षाला मूर्त स्वरूप देण्याकरितां एकादी संस्था स्थापन होते. मग तिच्या नांवानें कोणी भुलतात; संस्थेच्या किंवा पक्षाच्या फंडांतील एकादा तुकडा हातीं लागेल या आशेनें कांहीं मुंगळे चिकटतात; पक्षाच्या वर्तमानपत्रांत वारंवार नांव येऊन आपली लोकप्रसिद्धी व लोकप्रियता वाढेल ह्मणून

कोणी तींत घुसतात; आणि कित्येक आपला वकिलीचा दाक्तरीचा, संपादकाचा किंवा दुकानदारीचा धंदा वाढावा म्हणून पुढाकार घेतात. कोणी तर केवळ पक्षाच्या पुढाऱ्या बरोबर आह्मांलाही मेजवान्या, मिरवणुकी व टाळ्या मिळतील एवढ्याच करितां मिरवत असतात. तत्त्वांची आस्था बाळगणारेही कांहीं खरे अनुयायी असतात, व कांहीं स्वतःचे अंतःस्त डाव साधण्याकरितां त्यांत तात्पुरते मिळालेले असतात कोणताही पक्ष किंवा पंथ प्रारंभीं कितीही उदात्त व शुद्धस्वरूपाचा असला तरी त्याचा विस्तार होऊन अनेकविध माणसें आंत शिरलीं कीं तो मिश्र आणि रंगी बेरंगी होतो. मूळ प्रवर्तकांचें उदात्त हेतु लुप्तप्राय होऊन, ती एक प्रकारची जात, संघ, कंपू, किंवा विशिष्ट हेतूनें प्रेरित अशी टोळी बनते, टोळींतील विशेष जहाल आणि खटपटी लोकांकडे पुढारीपण येतें; आणि संघांत जे सात्त्विक व प्रामाणिक लोक सामील झालेले असतात ते हळुहळु बाहेर पडतात, इतरांच्या भीतीनें मुग्ध रहातात, किंवा वाहत्या गंगेबरोबर आपणही वाहूं लागतात. अनेक व्यक्तींनीं बनवलेल्या संघाची उत्क्रांति किंवा

अवकीर्ति दोहोंपैकीं कोणत्याही एका तऱ्हेनें होते. एकादा असामान्य लोकनायक प्रतिभाशक्तीनें सर्व लोकांचीं मनें आकर्षून त्यांना विशिष्ट कार्यांत प्रवीण करतो; अथवा असल्या लोकनायकाच्या व विशिष्ट ध्येयाच्या अभावीं व्यक्तिशः मतभेदाचा गोंधळ माजून संघाची फाटाफूट होते. त्या संघांत गुलामगिरीचें प्राबल्य असेल तर तो गचाळ आणि अकिंचित्कर होतो. उलट, बंडखोरी वाटेल तरी परस्परस्पर्धेनें तुकडे पडून तो नामशेष होतो. तात्पर्य, सर्व प्रकारच्या राष्ट्रिय चळवळींत कार्यकारी पक्ष व संघ बनवणाऱ्या व मोडणाऱ्या ज्या दोन अंधश्रद्धा व मतस्वातंत्र्य अशा आकर्षक आणि निद्रावक शक्ति उद्भवतात त्यांनाच गुलामगिरी आणि बंडखोरी अशीं सर्वपरिचित नांवें देतां येतील. या दोन्ही शक्ति राष्ट्रप्रगतीला आवश्यक आहेत; पण त्यांचा अतिरेक झाल्यानें कसे हास्यास्पद व अनिष्ट परिणाम होतात हें पाहणें पुष्कळदां बोधप्रद होतें.

धार्मिक, सामाजिक, राजकीय, वगैरे अनेकचळवळी प्रत्येक देशांत विचारांच्या जागृतीनें उत्पन्न होतात,

व वेळोवेळीं त्यांची रूपांतरेंही होत असतात. देशां- तील बुद्धिमान् पुरुष नवीन विचारांना चालन देतात व त्यांचा जनतेवर जसा परिणाम होतो त्याप्रमाणें नवे पक्ष' संस्था व चळवळी उत्पन्न होतात त्यांचे मुळाशीं जर एखादें व्यापक, उदात्त, आणि स्फूर्तिदायक तत्व असलें तर त्या संस्था व चळवळी चिरस्थायी होतात, नाहींतर इंजन मोडल्याबरोबर आगगाडी थांबते त्याप्रमाणें चालन देणाऱ्या पुढाऱ्याबरोबरच त्याच्या चळवळीही थंडावतात. पुढारी दोन प्रकारचे असतात' एक राष्ट्राच्या अंतिम ध्येयाचा सांगोपांग विचार करून एका पिढीत जनतेला जितके पचेल व जावेल तितकेंच पाऊल टाकणारे, व दुसरे, वेळीं जें मिळेल तें शस्त्र हातीं घेऊन जनतेला जागृत करून पुढे ढकलणारे. पहिले मार्गदर्शक होतात. दुसरे चालक आणि उद्दीपक असतात. दादाभाई नौरोजी, रानडे, क्रिस्तोदास पाल, बिवेकानंद हे पहिल्या वर्गातले होत; आणि टिळक, गांधी व अलीबंधु हे दुसऱ्या प्रकारचें म्हटले पाहिजेत. टिळकांनीं गणपतिउत्सव, शिवजयंती होमरूलसंघ यांच्या द्वारें लोकजागृति केली व गांधींनीं

खिलाफत व पंजाब प्रकरणांचे निमित्त करून लोकांना प्रदीप्त केलें. दोघांनींही नुसत्या स्वराज्याकडे बोट दाखवलें, पण तें स्वराज्य कोणत्या प्रकारचें, त्याचे मार्गांतील आडचणी कशा दूर करावयाच्या, व तें प्राप्त करून घेण्याची साधनें कशीं मिळावयाचीं याचा त्यांनीं स्वतः फारसा विचार केला नाहीं, व लोकांनाही करण्यास शिकविलें नाहीं. स्वराज्य चळवळीच्या समुद्रांत लोकांना एकदां ढकलून दिलें, म्हणजे ते कसे तरी हात पाय हालवून तरंगतील व कोठेंतरीं व केव्हांतरीं पैलतिराला जाऊन पोंचतील अशा भावनेनेंच त्यांनीं आपल्या उद्दीपक चळवळी सुरू केल्या. लोकांना पोहावयास शिकविणें, पैलतिरापर्यंत सर्व मार्ग आखून देणें, व मध्यें न बुडतां सुरक्षितपणें निभावण्यास लागणारीं साधनें प्राप्त करून देणें हें त्यांना स्वकर्तव्य वाटलें नाहीं, व तें करण्याला लागणारी शांतवृत्ति, व्यापकबुद्धि आणि धीर हे गुणही त्यांचेजवळ नव्हते. दादाभाई, रानडे यांचें राजकीय ध्येय संकुचित होतें, पण त्याविषयीं त्यांनीं सांगोपांग विचार केलेला होता. उलट पक्षीं टिळक गांधी यांचें ध्येय अत्युच्च; पण केवळ दुरून बोट दाख-

वूनच त्यांनीं लोकांना तिकडे प्रवृत्त केलें. रानडे, दादाभाई हे मुत्सद्दी होते; पण टिळक, गांधी हे नुसते सेनापति व लढवय्ये झाले. सेनापतीचें लक्ष तात्कालिक जयाकडे असतें, पण मुत्सद्दी पुरुष राष्ट्राची कायमची घटना करण्याविषयीं विचार करीत असतो. सामान्य जनतेला सेनापति अधिक प्रिय होतो, कारण त्याचें कार्य सद्यःफलदायी आणि लोकांची दृष्टि दिपविणारें असतें; पण राष्ट्राच्या इतिहासांत मुत्सद्यांनाच अग्रस्थान देण्यांत येतें. ग्यारिबाल्डीनें इटलीच्या स्वातंत्र्याकरितां लढाई मारली, पण स्वतंत्र इटलीची कायमची घटना काव्हूर यानेंच केली. मोल्टकेपेक्षां बिस्मार्क, टोगोपेक्षां मार्क्विस इटो व वेलिंगटनपेक्षां पील आणि ग्लॅडस्टन यांस श्रेष्ठ मानतात. टिळक गांधी हे ल्युथर माझिनी टाल्स्टायप्रमाणें राष्ट्राचें ध्रुवदर्शक ह्मणून स्मरणीय होतील. परंतु भरतखंडाच्या स्वराज्याची खरी लढाई आणि खरी मुत्सद्देगिरी त्यांचे टपक्यांत आली नव्हती व ती अजून पुढें यावयाचीच आहे. हें विसरतां कामा नये.

जगांतील घडामोडीमुळें हिंदुस्थानांतील राजकारणाला उत्तरोत्तर गंभीर स्वरूपही येत आहे. त्याची पूर्व तयारी आज सुरू झाली आहे म्हटलें तरी चालेल. हल्लींचें राजकारण म्हणजे राष्ट्रिय सैन्याला कवाईत शिकविण्याची शाळा होय. कवाईतींतील पुष्कळ फेरफटके व्यवहारांत निरुपयोगी दिसतात. पण, व्यवस्था, शिस्त, चलाखी धैर्य आज्ञाधारकपणा वगैरे लढाईचे गुण रोजच्या कवायतीनेंच आंगी उत्पन्न होतात. महात्मा गांधीच्या असहकारितेनें स्वराज्य कसें मिळणार, असा पुष्कळ प्रागतिक सवाल करितात; पण स्वराज्य मिळविण्याला जरूर लागणारें स्वावलंबन आणि आत्मसंयमन असहकारितेनें आंगीं येतें, ही गोष्ट त्याचे लक्षांत येत नाहीं. टिळकांचे राष्ट्रिय उत्सव आणि गांधींची असहकारिता या दोन्हीं चळवळी भावी खऱ्या लढाईपूर्वीच्या कवाइती आहेत. प्रत्यक्ष कुस्तींत मलखांब आणि जोर करायाचे नसतात, हें खरें; परंतु शरीरांतील स्नायु मजबुत आणि सुटसुटीत होण्याकरितां ती कसरत अगोदर करावी लागते हल्लीच्या बहुतेक राजकीय चळवळी आखाड्यांतील

कसरती आहेत. राष्ट्रिय उत्सव केले काय, चरका फिर-
विला काय, किंवा असहकारिता आणि कायदेभंग
करून तुरुंगांत गेलं काय, हें सर्व हिंदी जनतेच्या शरी-
रांतील शक्तिवर्धक आणि राष्ट्रिय भावना जोरदार
करून पुढील कुस्तींची तयारि करणारे उपाय आहेत.
असल्या कसरतीनें शरीर कमावलें ह्मणजे प्रत्यक्ष
कुस्तीचे पांचपेंच शिकण्यास फारसा वेळ लागावयाचा
नाहीं; व तें शिकविणारा वस्तादही योग्य वेळीं
उत्पन्न होईल. आखाड्यांत दुसऱ्याकडून बुक्के मारून
घेऊन शरीर घट्ट करणें हीच गांधीची अनत्याचारी
असहकारिता; समाजासमोर लाज सोडून व नुसता
काच्या मारून धुळींत लोळणें हें खादी व्रत;
आणि प्रतिस्पर्ध्यांची भीती अजीबात नष्ट होण्या-
इतकें आत्मसामर्थ्य संपादन करणें हीच स्वराज्याची
तयारी. गांधी ह्मणतात, आखाड्यांत इतकी तयारि
झाल्यावर कुस्ती जिंकण्यास कांहीं कठीण नाहीं.
आपणास पुढें कुस्ती जिंकावयाची आहे ही प्रतिज्ञा
करण्याचा पहिला धडा लोकमान्य टिळकांनीं
राष्ट्राला दिला; पण ती जिंकण्याकरितां आखाड्यांत

ग्रंथ संग्रहालय

कसरत कशी करावयाची हा दुसरा धडा महात्मा गांधी आपणास शिकवित आहेत. कांहींना तो पटला ह्मणून ते आखाड्यांत उतरले आहेत; बाकीचे कांठावर बसून मजा पहात आहेत. कांहीं आरंभशूर लोकलज्जेस्तव प्रथम हौद्यांत उतरले, पण धक्के बसूं लागतांच आतां पळुन जाण्याची वाट शोधीत आहेत. पळपुटे लोक शरीर बचावतील; पण लढाई थांबवूं शकत नाहींत. वस्तुतः कुस्ती मारणें किंवा लढाई जिंकणें हें कांहीं मनुष्याच्या आयुष्यांतील मुख्य कर्तव्य नाहीं. हे तारुण्यांतील खेळ आहेत. श्रीकृष्णानीं पूर्ववयांत मल्लविद्या संपादन करून कंसचाणूरांचा नाश केला, पण श्रीकृष्णाचें खरें चरित्र उत्तरार्धांत कौरव पांडवांच्या राज्यांत दिसून आलें. प्रत्यक्ष लढाईपेक्षां युक्ति आणि राजनीति हींच चिरफलदायी असतात पण त्यांचा उपयोग होण्याला आंगीं सामर्थ्य असावें लागतें. राष्ट्राच्या जीवनक्रमांत झटापटीचे अनेक प्रसंग येतात व त्याकरितां तयारीही ठेवावी लागते, पण एकंदरीनें दूरदृष्टि आणि मुत्सद्दीपणा यांचाच उपयोग जास्त होतो. जनरल फ्रेंच, फॉक्, आलनबी

यांनीं जर्मन सैन्याचा पराभव केला खरा; पण महत्वाकांक्षी जर्मन राष्ट्राचे कायमचे बंधन विल्सन लॉइड जार्ज, क्लेमेन्को या मुत्सद्दयांनींच केलें असें म्हटलें पाहिजे. टिळक गांधी हे आपले मल्लविद्येचे वस्ताद होते. त्यांनी लोकांत जागृति उत्पन्न करून युद्धाला सज्ज केलें. तसेंच त्यांनी' स्वराज्य, शब्द लोकांच्या नित्य पाठांत आणला. पण हिंदी स्वराज्य म्हणजे काय, याची त्यांनी लोकांस समजूत करून दिली नाहीं; व खुद्द त्यांनी तरी त्याचा पूर्ण विचार केला होता कीं नाहीं, याची शंकाच आहे. "स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे" हा मंत्र लो. टिळकांनीं एकदां कोठें उच्चारला, व गांधींनीं एका वर्षांत स्वराज्य देतों म्हणून आश्वासन दिलें, पण सर्वांना समजेल असें त्या स्वराज्याचें स्वरूपकथन दोघांनींही केलें नाहीं. आपणास मिळावयाचें स्वराज्य तें " डोमिनियन स्वराज्य " हें गांधींनी अखेरी अखेरीस जाहीर केलें. तें प्रारंभींच सांगितलें असतें तर लोकांचा सरकारचा व खुद्द गांधींचा कितीतरी गैरसमज झाला असता. मांटेग्यू व शास्त्री म्हणतात कीं, हें डोमिनियन स्वराज्य हिंदुस्थानाला गुदस्तांच मिळालें; मग गांधींना

एका वर्षांत नवें काय मिळवावयाचें राहिलें ! टिळकांनीं स्वराज्याकरितां विलायतेस स्वारी केली ह्मणून व तेथें जाऊन चिरोलचे खिशांत दोन अडीच लाख रुपये ओतले आणि चार स्नेह्यांना विलायतेची यात्रा करून दिली. तसेंच गांधींनींही स्वराज्याकरितां एक कोट रुपये जमा करून चर्खेवालें व खादीवाले व्यापाऱ्यांना बिनव्याजी भांडवल दिलें. पण खऱ्या स्वराज्याचा पत्ताच नाहीं हा त्या महात्म्यांचा दोष नाहीं लोकांप्रमाणें तेही शब्दाचे गुलाम होते; आणि शाब्दिक ध्येयाचे मागें लागूनच खरी वस्तु मिळविण्याची पात्रता लोकांचे आंगीं येईल अशी त्यांची दृढ समजूत असावी. घोड्यांच्या शर्यती किंवा कुस्त्यांची दंगल करण्यांत लाखो रुपये उडविणारे लोक प्रत्यक्ष फलाची अपेक्षा करीत नसतात; तशीच स्वराज्याची चळवळ. राष्ट्रांत हुरूप आणून जिवंतपणा राखण्याकरितां हा सर्व खेळ. असले खेळ उपयोगी व जरूर आहेत हें खरें; व तेवढ्यापुरतें गांधी टिळकांनीं राष्ट्रकार्य केलें असें म्हणतां येईल. पण किती झालें तरी तो खेळ, किंवा फार झालें तर तालमींतली कुस्ती, एवढेंच.

खऱ्या युद्धाचें तोंड अजून लागलें नाहीं, व त्यानें मिळणारें स्वराज्यही लांब आहे, हें आपण विसरतां कामा नये. वस्तुतः हिंदी राष्ट्र अजून पुरें संघटित व्हावयाचें आहे; व ती संघटना पूर्ण झाल्याशिवाय हिंदी राष्ट्राचें स्वराज्य कोणत्या स्वरूपाचें होईल, हें आजमितीस सांगणें कठीण आहे. सामान्य जनसमूहाला या अडचणी दाखविल्यास उत्साहभंग होऊन जोम कमी होईल या भीतीनें राजकीय सूत्रधार मधून मधून चळवळीची नाटकें लोकांपुढ करीत असतात. दादाभाई नौरोजीच्या "अधिकारदानविवेचना"* पासून तो महात्मा गांधींच्या 'मानापमान' नाटकापर्यंत गेल्या साठ सत्तर वर्षांत आपण पुष्कळ राजकीय नाटकें पाहत आलों, व त्यामुळें थोडेंबहुत लोकशिक्षणही झालें; पण हे करमणुकीचे दिवस संपून खऱ्या राष्ट्रकार्याची वेळ जवळ येत आहे हें विसरतां कामा

---

* शंकर मोरो रानडे यांचें नाट्यकथार्णवांतील यूरोपियन ज्यूरी संबंधी "अधिकारदानविवेचना" नाटक व खाडीलकरांचें 'मानापमान' हीं दोन्हीं प्रसिद्ध आहेत.

नये. आजपर्यंतच्या चळवळी घरांतले खेळ होते. व आपल्या पालनकर्त्या इंग्रजांशीं आपण अनेक झटापटी करीत आलों, पण आतां हिंदी राष्ट्र मोठ्या राष्ट्रसंघांत सामील झाल्यामुळें जगाच्या समरांगणावर येत आहे. आतां आपल्याला इंग्रजांपासून नुसते फिरकोळ अधिकार मिळवाययाचे नाहींत, किंवा वसाहतींतील स्वराज्य मिळवूनही स्वस्थ बसावयाचें नाहीं. टर्कीतील खिलापतीचा, आफ्रिका, आस्ट्रेलिया, कानडा येथील हिंदी लोकांचा, अफगाणिस्थानांतील व जपानाकडील भानगडींचा व सर्व देशांतील व्यापाराचा व आर्थिक चलबिचलीचा यापुढें आपणाला विचार करणें भाग आहे. इंग्रज लोकांनीं आपणास जबाबदार राज्यपद्धति दिल्यामुळें सर्व प्रकारची जबाबदारी आपले शिरावर घेण्यास तयार झालें पाहिजे. सरकारला नुसत्या शिव्या देऊन किंवा विध्वंसक टीका करून आतां भागावयाचें नाहीं. सैन्याचा खर्च कमी करा, सर्वांना समान हक्क द्या, काळा गोरा भेद काढून टाका, हरएक काम लोकांचे संमतीनें करा, हिंदी लोकांचा दर्जा वाढवा, वगैरे मागण्या आपण कित्येक वर्षें मागत

आलों; आतां त्या मागण्या अंमलांत आणण्याची जबाबदारी राज्यकर्ते हळू हळू आपल्यावर टाकीत आहेत. स्वराज्य मिळाल्याबरोबर या सर्व अडचणी दूर होतील ही आशा व्यर्थ आहे; कारण पूर्ण स्वराज्य भोगणाऱ्या अनेक देशांत, किंबहुना खुद्द इंग्लंडांतही असल्या आपत्ति आहेत. पुण्याची म्युनिसिपालिटी राष्ट्रीय पक्षाचे हातांत तीन वर्षे होती व पुढेंही राहील पण आवडत्या चळवळींना म्युनिसिपालिटीच्या पैशाची खैरात करण्यापलीकडे कोणतें कार्य झालें आहे ? रस्त्यांतले खाडे, गटारांतली घाण, कंदिलांच्या तेलाची चोरी, नोकरांचा कामचुकारपणा, आणि कौन्सिलरांची वाचाळता आहे तशीच आहे. एका शहरच्या स्वराज्याची ही दशा, मग सबंध राष्ट्राचें स्वराज्य कसें हांकलें जाणार ? वादविवादांत हार आली कीं मतें घ्या, व कोणी फार बडबड करूं लागला तर त्याचे तोंडाला पैशाचें कुलप घाला, असल्या उपायांनीं कोणत्याही शहराचा किंवा देशाचा कारभार फार दिवस हांकला जात नाहीं. इंग्रजांनीं स्थानिक स्वराज्य आमचे ताब्यांत दिलें आहे; आणि प्रांतिक स्वातंत्र्य देण्याचाही

विचार चालू आहे, कदाचित तेंही लवकर मिळेल. असें मानूं पण मग तें चालवावयाचें कसें? बहुमताचे जोरावर आपल्या स्नेहीसोबत्यांची तरतूद करणें एवढीच ज्यांची स्वराज्याची कल्पना असेल त्यांच्यापेक्षां लोकहिताची काळजी वाहणारे परकीय राज्यकर्ते काय वाईट? युरोपांतील कित्येक स्वतंत्र ह्मणविणारीं राष्ट्रें दुसऱ्यांचीं गुलाम आहेत, व इंग्लंड फ्रान्स सारख्यांनाहीं कर्जामुळें अमेरिकेपुढें मान वाकवावी लागत आहे. नुसत्या स्वराज्य शब्दांत कांहीं मातबरी नाहीं. तें स्वराज्य चालविण्याची धमक, सामर्थ्य आणि कार्यक्षमता आपले आंगीं आली तरच त्या स्वराज्याचें चीज. नाहींतर म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष होऊन गुप्तपणें अधिकाऱ्यांच्या भेटी घेणाऱ्या आपल्या माणसापेक्षां सरकारी अधिकारीच राजरोसपणें अध्यक्ष झालेला बरा असें ह्मणावें लागणार! न्याय व वजावणी खात्यांच्या विभागणीचा प्रश्नही असाच विकट आहे. सर्व अधिकार आपले लोकांचे हातीं यावे ही इच्छा उत्कृष्ट; पण पुष्कळांचा आपले लोकांवर अजून विश्वास बसत नाहीं, ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. गेल्या मुंबई कौन्सि-

लांत १९ ब्राह्मणेतरांनीं रा. ब. चितळ्याच्या अधिकारविभागणींच्या ठरावाला विरोध केला, आणि पेणच्या ब्राह्मण जमीन-मालकांनीं साहेब कलेक्टरालाच मध्यस्थ नेमण्याचा शिफारस केली, यावरून काय बोध घ्यावयाचा ? जाती, धर्म, पक्ष इत्यादि वासनांनीं हिंदी लोकांची न्यायबुद्धि कलुषित होते; पण परकी विधर्मी लोक निष्पक्षपाती राहतात असें जों पर्यंत पुष्कळांना वाटत आहे तोंपर्यंत अधिकाराची कोरडी मागणी पोकळच होय. तात्पर्य, नवीन अधिकार मिळविण्याचे प्रयत्न करतांनाच ते अधिकार बजावण्याची पात्रता आपले लोकांत आणणें, हेंही लोकनायकांचें कर्तव्य आहे, हें तत्त्व अजून लोकांचे अंतःकरणांत चांगलें बिंबलेलें नाहीं.

सध्यां लोकांचे डोक्यांत घोळणाऱ्या कित्येक विषयांसंबंधानें वर जें विवेचन केलें, त्याचा मुख्य उद्देश रूढ पद्धतीहून निराळ्या दृष्टीनें कोणत्याही प्रश्नाचा विचार केला असतां त्याचें स्वरूप कसें निराळें दिसतें हें दाखविण्याचा आहे. राजकारण हें वारंवार बदलणारें जिवंत शास्त्र असल्यामुळें त्यांत विचार स्वातंत्र्याची फारच जरूर असते. शिवाय राजकारणाचा अज्ञ

ग्रा. क्र. २२२६

जनसमूहाशीं संबंध येत असल्यानें अनेकवेळां सत्य बाजूला राहून पोकळ शब्दांनींच लोकांना मोह पाडण्याचे प्रयत्न स्वार्थसाधू लोक करतात. स्वराज्य, असहकारिता, सत्याग्रह, दडपशाही, नोकरशाही वगैरे प्रचलित शब्दांची हल्लीं कशी ओढाताण आणि दुरुपयोग होतो हें पाहिलं, ह्मणजे भाषा हें लोकांना भुलविण्याचें साधन आहे असें वाटूं लागतें. कोणत्याही खऱ्याखोट्या आरोपाचा प्रतिकार न करणें ही असहकारिता, मुळशी धरणांत दगड टाकणें हा सत्याग्रह, टाटा कंपनीचे मजूर ही नोकरशाही, आणि सरकारी ठराव ही दडपशाही; राष्ट्रिय पक्षाचें म्हणून शिवराळ पत्र छापणें हा वाङ्मयप्रसार, चार दोन फंडांतून पगार खाणें ही देशसेवा, आणि कौन्सिलांत शिरून मिनिस्टर होणें ही प्रतियोगी सहकारिता, असलें शब्दजाल राजकारणांत जसें वाढतें तसें इतर विषयांत निघत नाहीं. असल्या शब्दप्रयोगांनीं सामान्य लोकांना भुलविणें म्हणणें बाजारांत खोटीं नाणीं चालविण्यासारखेंच आहे. कांहीं दिवस लोक फसतात, पण कांहीं दिवसांनीं व्यक्तीचें खरें स्वरूप बाहेर पडून पवित्र मानलेल्या

शब्दांचीही विटंबना होते. राष्ट्रिय शिक्षणाच्या नांवानें उनाड पोरें गोळा करणें, लोकांच्या पैशाचा मनसोक्त ट्रस्ट करून ते हवेतसे वापरणें, ब्रिटिश राज्यांत कायद-भंगाविरुद्ध लेख लिहून भिऱ्या संस्थानिकाचे राज्यांत तो करविणें, वगैरे विसंगत कृत्यांनीं उदात्त समजलेल्या कल्पनाही उपहासास्पद होतात. सार्वजनिक चळवळींत अनेक प्रकारचीं कमी अधिक लायकीचीं माणसें पड-ल्यानें असे प्रकार व्हावयाचेच; पण देशकार्याचा झरा नेहमीं शुद्ध आणि स्फूर्तिदायक ठेवण्याची जबाबदारी पुढाऱ्यांवर असते. दादाभाई, मेथा, गांधी, लजपतराय अरविंद यांचेसारखा निःस्वार्थी आणि निरपेक्ष पुढारी डोक्यावर असला तर त्याचा अनुयायांवर कांहा वचक राहतो; पण तो फंडाचे किंवा लोकप्रियतेचे मोहांत सांपडला कीं बिकलाच म्हणून समजावें. अनुयायांचे तंत्रानें वागणारा पुढारी अनुयायांचा अंकित होतो, व मग त्याचा अवतार संपुष्टांत आलाच म्हणावयाचा देशाचें राजकारण ही खडतर तपश्चर्या आहे. तींत मोह पाडणारीं अनेक विघ्नें येतात, बुद्धिभ्रंश करणारे प्रसंग येतात, आणि नाश करणारे शत्रूही उभे राहतात. या

सर्वांच्या मार्ग्यांतून निभावून नीतिभ्रष्ट होत नाहीं तोच देशाचा खरा नेता होतो. तत्कालीन लोकप्रियतेच्या मोहांत न सांपडतां उच्च ध्येयावर अढळ लक्ष्य ठेवून जनसमाजाला तिकडे ओढतो तोच खरा मार्गदर्शक. मोझेस, क्राइस्ट, बुद्ध, शंकराचार्य, माझिनी, टाल्स्टाय हे अशा प्रकारचे होते. हिंदुस्थानांतही अलीकडे, श्रीरामकृष्ण, विवेकानंद वगैरे कांहीं माणसें निपजलीं; पण राजकारणाचा प्रवाह अजून व्हावा तसा शुद्ध झालेला नाहीं. परकी राज्यकर्त्यांविषयीं रागद्वेषाच्या गढूळ पाण्यानें जोपर्यंत पुढाऱ्यांचीं मनें कलुषित होत आहेत तोंपर्यंत पुढाऱ्यांची दृष्टि ही संकुचितच राहणार व राष्ट्रियत्वाचें उच्च ध्येयही नजरे आड राहणार. उदाहरणार्थ, महात्मा गांधींची असहकारिता ही एकप्रकारें सापेक्षच म्हटली पाहिजे. म्हणजे ती खिलाफत व पंजाब अन्यायांचें परिमार्जन करण्यास निपजली, व तें साध्य होईपर्यंतच तिचें अस्तित्व. महात्मा गांधींचा एक डोळा सरकार वठणीवर येतें कीं काय हें पाहण्याकडे, व दुसरा लोकांकडे होता. असहकारिता हा जर आपला खरा ह[illegible]पाय आहे तर तो सापेक्ष

आणि मुदतीचा कां ? अमुक फलप्राप्तीसाठीं केलेली तपश्चर्या गौण, कारण असल्या स्मशान वैराग्यानें केव्हांही मुक्ति मिळत नाहीं. दोन दिवस बायकोवर रुसल्यानें ज्याप्रमाणें संसारत्याग केलासें होत नाहीं, त्याचप्रमाणें गांधींची मुदतबंदीची असहकारिता ही खरी असहकारिता नव्हे. जन्मभर इंग्रज लोकांशीं सहकार्य करणारे गांधी पंजाब-जुलमाच्या निमित्तानें क्रोधाविष्ट होऊन सरकाराशीं असहकारी झाले; पण त्यांतही इंग्रज लोक चांगले व कधीं काळीं ते आपणाला न्याय देतील ही त्यांची भावना गेली नाहीं. हा त्रिदंडी संन्यास, खरें वैराग्य नव्हे. टिळकांचाही ब्रिटिश कोर्टांवर असाच विश्वास होता, व त्यामुळेंच हजारों रुपये त्यांनीं कोर्टांचे दारांत व चिरोलचे खिशांत ओतले. हिंदी राजकारणांतले हे पहिले ऋषि एकमार्गी असल्यामुळें त्यांची तपश्चर्या अपुरी पडली; पण त्यांचे अनुभव पुढील लोकांना उद्‌बोधक होतील; यांत शंका नाहीं.

हे उद्‌बोधन व्हावयाला आपण प्रचलित भाषा आणि विचारसरणी यांचा क्षणभर त्याग करून मूल-

भूत तत्त्वांचा विचार केला पाहिजे. प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांत असे कांहीं काळ येतात कीं, तेव्हां धोपटमार्ग सोडून राजकारणाच्या मूलभूत तत्त्वांची उजळणी करावी लागते. विशेषेंकरून कांहीं अलौकिक पुढाऱ्यांनीं कृत्रिम तट उत्पन्न करून विशिष्ट मतांचा फैलाव केल्यामुळें जनसमाज एककल्ली होत जातो त्यावेळीं लोकांना खऱ्या तत्त्वाची ओळख करून देऊन मार्गावर आणणे फार जरूरीचें असतें. उत्पादकांच्या उदात्त तत्त्वांना मतलबी अनुयाया विकृत स्वरूप देऊन आपला रोजगार कसा वाढवितात याची इतिहासांत अनेक उदाहरणें आहेत; व याचीच हल्लींही पुनरावृत्ति होत आहे. म्हणून या मूलभूत तत्त्वांची पुनः पुनः उजळणी करून त्यावर सांचलेला केरकचरा झाडून टाकावा लागतो. तसें करतांना ज्यांना चिमटा बसतो ते अर्थातच रागवणार, दुसऱ्यावर कुत्सित आरोप करून आपली व्यंगें झांकणार, व प्रसगीं पैशाच्या व सोबत्यांच्या मदतीनें हुल्लडही माजविणार. पण त्यामुळें सत्य झांकून राहत नाहीं रोगी ओरडेल म्हणून शस्त्रवैद्य शस्त्रक्रिया थांबवीत नाहीं, किंवा गुन्हे-

गार रागावेल म्हणुन न्यायाधीश न्याय देण्यास चुकत नाहीं. राजकारणांतील अतिरिक्त अंधभक्ति आणि वंडखोरी हे दोन्ही रोग घालविण्याला विचारस्वातंत्र्य आणि स्पष्टवक्तपणा हींच मारक औषधें आहेत, डॉ. जान्सननें एके प्रसंगीं बास्वेलला सांगितलें:—

"My dear Sir, clear your mind of Cant. You may talk as other people do.........But don't think foolishly."

—ह्मणजे लोकरूढीला अनुसरून बोलण्यांत प्रचलित भाषा वापरली, तरी प्रत्येक प्रश्नाचा विचार प्रांजलपणें करण्याची संवय ठेवावी. तसेंच तीन वर्षांपूर्वी एडिनबरोमध्यें एकदां भाषण करतानां लाईड जॉर्ज ह्मणाले:—

"Formulas are very useful, but very dangerous. That is one of the lessons of the war: trust not overmuch in formulas. I could give you several political and military formulas discridited by abuse and which have cost the nation dearly".

आपले येथें असले फार्म्युलें किंवा मंत्र बरेच रूढ झाले आहेत. गांधींची "अनत्याचारी असहकारिता", व

नेमस्त पक्षाची " सनदशीर चळवळ " हे अशाच प्रकारचे फार्म्युले ऊर्फ मंत्र आहेत. राष्ट्रिय पक्षाचें " स्वराज्य " व नेमस्तांचे " वसाहतींतील राज्य " हेही फार्म्युलेच आहेत. त्यांचा खरा अर्थ फारच थोड्यांना कळतो; पण केवळ शब्दोच्चारानें सामान्य लोक फसतात, सबब असल्या शब्दप्रयोगांच्या मुळाशीं काय अर्थ असतो त्याची जाणीव लोकांना वरचेवर करून दिली पाहिजे. ज्या विवाक्षित ध्येयाकडे राष्ट्राला जावयाचें असतें, त्याचा रस्ता सोडून आडबाटेला लोक जाऊं लागले तर त्यांना पुन्हां रस्त्यावर आणण्याकरितां प्रकाश पाडावा लागतो. दर दहा पांच वर्षांनीं प्रचलित राजकारणाची उजळणी करावी लागते ती एवढ्याकरितां. सरकारालाही आपल्या ठराविक धोरणाची वारंवार फेरतपासणी करणें भाग पडतें. मग लोकांनींही तसें कां करूं नये ? अनुभवानें मागील चुका लक्षांत येतात, व परिस्थिति बदल्यामुळें नवा कार्यक्रम स्वीकारावा लागतो. गांधींनीं चुका कबूल केल्या व दर तीन महिन्यानी कार्यक्रम फिरविला ह्मणून कित्येक त्यांचा उपहास करतात, पण वस्तुतः प्रगमनशील राजकारणाचें खरें तत्त्व

म. गांधीनाच समजलें होतें. दुसरेंही पुढारी चुका करतात व आचरण बदलतात; पण तसें कबूल करण्याचें नीतिधैर्य त्यांच्यात नसतें.

अशाच प्रकारची एक चूक लो. टिळकांनीं केली व तिचे परिणाम हल्लीं सर्व देशाला भोगावे लागत आहेत. ती चूक ह्मणजे ' कांग्रेस डेमोक्राटिक पार्टीची स्थापना होय. पूर्वीं कांग्रेसमध्यें आपलें चालत नव्हतें, ह्मणून ते सुरतेला बाहेर पडले. पुढें महायुद्धामुळें लोकमतांत क्रांति झाल्यानें लखनौस राष्ट्रिय पक्षाचा कांग्रेसमध्यें प्रवेश झाला व टिळकांचें प्राबल्य झालें. तें कायम टिकविण्याकरितां 'कांग्रेस डेमोक्राटिक पार्टी' निघून कांग्रेसचे ठराव सर्वांनीं पाळलेच पाहिजेत हें नवें तत्त्व निघालें. पूर्वींची मेथा गोखले पक्षाची अरेरावी जाऊन राष्ट्रिय पक्षाची अरेरावी सुरू झाली. मेथा यांची अरेरावी फक्त कांग्रेसमंडपांतच असे, ती आतां सर्व देशभर बारा महिने आणि खाजगी व्यवहारांतही भासूं लागली. कांग्रेस–ठरावांना विरोध करणारांनींही ते पाळलेच पाहिजेत असें नवें शास्त्र निघालें. सरकारी कायद्यांचा

अंमल नोकरशाही करणार, व कांग्रेसचे कायदे प्रचा-रक लादणार, अशा दुधारी कात्रींत सांपडल्यानें जन-समाजाचे फारच हाल होऊं लागले. एकाचे ऐवजीं आतां दोन अरेरावी नोकरशाह्या हिंन्दुस्थानांत उत्पन्न झाल्या. सरकारी नोकरशाहीनें खटला करावा. व कांग्रेस–नोकरशाहीनें ह्मणावें बचाव करूं नको व अपील करूं नको. या दुहेरी माऱ्यांत परांजप्यासारखा निर-पराधी आरोपीही तोंड बांधून तुरुंगांत खितपत पडतो. असहकारिता करण्याकरिता ह्मणून निघालेली कांग्रेस-नोकरशाही येणेंप्रमाणें अप्रत्यक्षपणें विलायती नोकर-शाहीला पूर्णपणें मदत करीत आहे. हा परिणाम कशाचा ?- कांग्रेसच्या आज्ञा सर्वांनीं पाळल्याच पाहि-जेत, या अरेरावी तत्त्वाचा. त्या आज्ञा तरी काँग्रेसनें दिलेल्या असतात असें नाहीं. खादी कपड्यांतून वस्त्रगाळ शुद्ध करून घेतलेले पांच सहा हजार प्रति-निधींची कांग्रेस; त्यांची सारभूत 'ऑल इंडिया कमिटी;' व तिचा अर्क काढलेली छोटी ' वर्किंग कमिटी. ' या वर्किंग कमिटींतील सात आठ जणांनीं सर्व राष्ट्राला आज्ञा करावयाची; व ती न पाळील तो देशद्रोही, जणूं

काय सर्व राष्ट्राचें शहाणपण या सात आठ जणांचे डोक्यांत व दाढींत सांठविणें आहे ? यापेक्षां विलायती नोकरशाही अधिक काय करते ? आपला अंमल अबाधित चालावा ह्मणून सोलापुरास टिळकांनीं 'म्यांडेट'चें तत्त्व काढलें; पण दैवगति विचित्र ! त्याच तत्त्वाचा फायदा घेऊन गांधींनीं टिळकपक्ष नामशेष करून टाकला. गुरूची विद्या गुरूसच फळाला आली. अरेरावी अंमलाचा असाच परिणाम होतो. फ्रेंच रेव्हाल्यूशनचे वेळीं कम्यून, टेरर, डायरेक्टरेट व शेवटीं एकछत्री एंपरर, असें अधिकाराचें पर्यवसान झालें. रशियांतही गेल्या चार वर्षांत तोच प्रकार झाला. राष्ट्रिय सभेंत मेथांची अरेरावी जाऊन बिझांटची, टिळकांची व शेवटीं गांधींची झाली, व अमदाबादेस एक डिक्टेटर नेमण्यापर्यंत मजल पोंचली. तेव्हां तीस कोटी लोकांचें मत एकट्या गांधींच्या मुठींत देणारे लोक किती नामर्द आणि बेवकूब असले पाहिजेत असें इतर देशांतील लोकांना वाटलें तर त्यांत काय चूक आहे ? लढाईचें वेळीं सर्व फौजेवर एक सेनापती असतो व त्याचा हुकूम सैन्यानें मानला पाहिजे, अशी

एक कोटी लढविण्यांत येते; पण त्या सेनापतीला हुकूम देणारें प्रधानमंडळ व प्रधानमंडळाचें नियमन करणारें पार्लमेंट वर असतें. तसें हिंदुस्थानांत कोठें आहे ? वस्तुतः कांग्रेस ही फौज नसून पार्लमेंट आहे. त्यांत सर्व पक्षांचा, सर्व मतांचा व सर्व प्रतीच्या व्यक्तींचा समावेश झालाच पाहिजे; व तशी सर्वसंग्राहक राष्ट्रिय सभा असेल तरच तिची किंमत व वचक. अमूक मताचा आणि अमूक पोषाख घालणारा इसम तेवढाच कांग्रेसवाला, असले खुळचट निर्बंध घालणें ह्मणजे निसर्गतः फोफावत वाढणाऱ्या झाडाला खच्ची करण्यासारखें आहे. वस्तुतः लढाऊ फौजेची उपमा होमरूल लीग, लिबरल लीग वगैरे कार्यकारी संघांना देतां येईल. त्यांनी पाहिजे तर आपल्या अनुयायांस आज्ञा सोडाव्या व सक्ती करावी. टिळकांनीं अदूरदृष्टीनें जो निर्बंध घालण्यास सुरवात केली, त्याचे परिणाम टिळकपक्षास आज भोगावे लागत आहेत. गांधींच्या डिक्टेटरशिपमुळें त्यांच्या कारागृहानंतर कांग्रेस अजीबात बुडते कीं काय अशी आतां भीति वाटूं लागली आहे. अधिकारलालसा सर्वांना मोह पाडते,

पण परिणाम कडू होतो. नेपोलियनच्या पराजयानें फ्रान्सचें वर्चस्व नष्ट झालें, तसें एकतंत्री अधिकारानें कोणतीही संस्था निर्जीव होते सर्व संस्थानांचें अध्यक्षत्व मिळालें असतां युद्ध संपल्याबरोबर सर्व अधिकार खालीं ठेवून शेतावर जाणारा जार्ज वॉशिंग्टन, किंवा चंद्रगुप्ताला राज्यावर स्थापल्यानंतर दुसऱ्याला दिवाणगिरी देऊन आपण अरण्यांत जाणारा चाणक्य यांचें उदाहरण प्रत्येक राष्ट्रनायकानें पुढें ठेविलें पाहिजे. टिळकांनीं वदललेलें राष्ट्रिय सभेचें स्वरूप पुन्हां पूर्ववत् सर्वसंग्राहिक करणें हाच राष्ट्रिय सभा जिवंत आणि कार्यक्षम करण्याचा खरा मार्ग आहे.

असो. सद्यस्थिति पाहून पक्षाभिनिविष्ट नसणाऱ्या कोणाही माणसाचे मनांत जे विचार सुचत आहेत त्यांचें येथें थोडेंसें दिग्दर्शन केलें आहे. मळलेल्या भांड्याप्रमाणें राष्ट्राच्या राजकारणालाही वारंवार उजळा द्यावा लागतो. पूर्वीच्या पिढींतील दादाभाई, मेथा, रानडे, गोखले गेले. बिझांटबाई दोन वर्षें धूमकेतू प्रमाणें प्रकाशून मागें पडली, लो. टिळक राष्ट्राला नवें चैतन्य देऊन अंतर्धान

पावले. महात्मा गांधींनीं राष्ट्राची दृष्टि अंतर्मुख करून आत्मनिष्ठ मोक्षाचें तत्त्व लोकांचे अंतःकरणांत बिंबविलें. सारांश प्रत्येक पुढाऱ्यानें स्वसामर्थ्यप्रमाणें राष्ट्राला थोडीफार गति दिली. पण आतां पुढें काय? दुसरा महात्मा उत्पन्न होईपर्यंत वाट पाहावयाची कीं सर्वांनीं चाकाला खांदा लावून गाडा पुढें ढकलावयाचा? मोठ्या झाडाखालीं लहान झुडपेंच उगवतात. त्याप्रमाणें टिळक गांधी यांनीं आपल्यामागें छोट्या चेल्यांचे व पुजाऱ्यांचे कंपू बनवून ठेवले आहेत. पण ते किती झालें तरी चेलेच. त्यांचीं मनें छोटीं, दृष्टि कोती, आणि इच्छा लहान. यांचे हातून मोठें राष्ट्रकार्य कसें व्हावें? हे अध्यक्ष, सेक्रेटरी, खजीनदार; वर्तमानपत्राचे संपादक वगैरे स्थानें पटकावून बसतील. पण नवें स्थान उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नाहीं. श्रीविठ्ठलाच्या सिंहासनावर उभा राहिलेला पुजारी विठोबा थोडाच होणार! संपलेल्या अंकांतील पात्रांनीं आतां पडद्यामागें जावें; व पुन्हां पडदा उघडून नवीं पात्रें पुढें आलीं तरच नाटक पुढें चालेल. नव्या परिस्थितीला अनुरूप असा नवा कार्यक्रम, नवीं माणसें आणि नवे पेचाचे योजले

पाहिजेत. जगांतील पुढारी राष्ट्रांमध्यें हिंदुस्थानाला अधिष्ठान मिळाल्यामुळें सर्व जगाच्या दृष्टीनें हिंदुस्थानाची भवितव्यता ठरविणें आतां प्राप्त झालें आहे. 'वसाहतिचें राज्य' शिळें झालें; स्वराज्यही आपण लायक झाल्याबरोबर सहज मिळेल; व ब्रिटिश साम्राज्याचा प्रश्नही गौण आहे. किंबहुना ब्रिटिश साम्राज्य हें नांवही लवकरच प्रचारांतून जाण्याचा संभव आहे. नव्या आयर्लंडाचे स्वराज्यघटनेंत 'ब्रिटिश एम्पायर'चे ऐवजीं 'ब्रिटिश कामनवेल्थ आफ नेशन' अशीं शब्दयोजना आहे. त्याचप्रमाणें हिंदूस्थान देशही इंग्रजसाम्राजांतर्गत नसून, ब्रिटिश राष्ट्रसंघाचा एक समान दर्जाचा सभासद यापूढें मानला जाईल. एका इंग्रज बादशाहाचे अमलांतील अनेक स्वतंत्र राष्ट्रांचा संघ बनविणें इकडे आतां इंग्लंडांतील दूरदर्शी मुत्सद्यांचें लक्ष लागलें आहे. अशावेळीं हिंदुस्थानचा दर्जा ठरवून घेणें आपलें कर्तव्य नव्हे काय ? वसाहतींचा प्रवास करणाऱ्या अनेक नामदार शास्त्र्यांची टवाळी करणारे लोक स्वतः या प्रश्नाचा विचार करीत आहेत काय ? कौन्सिलांत जावें कीं नाहीं; वकीली, डाक्टरी, दुकानदारी वगैरे क्षुल्लक प्रश्नांना

मोठें राष्ट्रिय स्वरूप देऊन खुळचट कमिट्या, पोरकट व्याख्यानें आणि शिळपट लेख लोकांपुढें नाचविण्यांत ज्यांना भूषण वाटतें, त्यांनीं देशाच्या खडतर राजकारणाची चिवडाचिवड न करतां नाटकें लिहून किंवा वकिली करून द्रव्य संचय करावा हें बरें. कांग्रेसचें फंड व अध्यक्षपणा चिटणीस वगैरे पोकळ मुद्दे आपले हातांत राहून योगक्षेम चालावा एवढीच इच्छा असेल तर तसें जाहीर करावें—असले भोंवरे कौन्सिलांत जाऊन नोकरशाहीचे बगलेंत शिरूं नयेत एवढ्याकरितां माहात्मा गांधींनीं कौन्सिल-बहिष्काराची मात्रा दिली. ज्याना ध्यावयाची नसेल त्यांनी बेधडक कौन्सिलांत शिरून गव्हर्नर साहेबांची चहापार्टी व शक्य असल्यास मिनिस्टरशिप मिळवावी, पण त्याकरितां लोकांपुढें भांडण्याचें प्रदर्शन कशाला! असल्या पोरखेळांनीं फसण्याइतके मूर्ख लोक आतां राहिले नाहीत. राज्यकर्ती नोकरशाही कमिट्या नेमून कालहरण करते; आमचे राष्ट्रीयही तेंच करूं लागले. महात्मा गांधींनी नोकरशाहीला ताळ्यावर आणण्याकरितां असहकारिता पुका-

रली. कमिटयावाल्या राष्ट्रियांवरही तोच प्रयोग झाल्यास बावगें काय होईल ?

वस्तुतः उपासनेचे अनेक पंथ आहेत, तसे राष्ट्रकार्याचेही अनेक मार्ग आहेत. ज्याची जशी लायकी व शक्ति असेल तसा त्यानें तो मार्ग राजरोसपणे पतकरावा. कौन्सिलांत जाऊन वक्तृत्व पाजळावयाचें असेल तर तिकडे जावें. तुरुंगांत तपश्चर्या करावयाची असेल तर येरवड्याची वाट धरावी. पण राजाचा वेष आणि विदूषकाची बतावणी असें करून लोकांची दिशाभूल करूं नये. लो. टिळक दिवंगत झाल्यापासून महाराष्ट्रांतील सत्यवक्तेपणा आणि कार्यनिष्ठा हीं बहुतेक नाहींशी झालीं आहेत. टिळकांनीं अचेतन कागद लोखंडाचा ट्रस्ट केला; पण आपल्या अमोलिक गुणांचा ट्रस्ट केला नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. असो आज महाराष्ट्राचें राजकारण खऱ्या पुढाऱ्यांचे अभावीं दुटप्पी स्वार्थसाधु लोकांचे हातीं गेलें आहे. या बेबंदशाहीचे वेळीं आपलें मतस्वातंत्र्य बजावून महाराष्ट्राना राजकारण ताळ्यावर आणणें लोकांच कर्तव्य आहे.

———:०:———

# पुरवणी.

वरील लेख लिहून झाल्यानंतर येथील राजकारणांत बरीच क्रांति घडून आली आहे व रोज नवे नवे रंग उत्पन्न होत आहेत. विशेषेंकरून महाराष्ट्रांत व वऱ्हाडांत शिमग्याचा जलसा जोरांत सुरू झाला आहे. नव्या कौन्सिलांना अजून दीड वर्ष अवकाश असतां आजच ही फाटाफुटीचीं घाई कां असा सहज प्रश्न उपस्थित होतो. गुदस्तां गांधीटोपीनें आच्छादलेलीं डोकीं आज एकदम अनावर को झाली, हें सध्या सर्वांनांच गूढ पडलें आहे. आतांच मतें बदलण्यांस काय कारण झालें, किंवा पूर्वी गांधीटोपीनें झांकलेलीं मतें सरकारी दडपशाहीच्या वाऱ्यानें टोपी उडून गेल्यामुळें उघडीं झालीं कीं काय, असेंही लोक विचारीत आहेत. वस्तुतः हें गूढ फारसें खोल नाहीं. लो. टिळक एकाएकीं अदृश्य झाल्यानें त्यांचा ' केसरी ' ट्रस्ट, त्यांचे फंड, त्यांचें पुढारीपण, व त्यांची शिष्यशाखा एकदम विस्कळित झाली. हीं सर्व सूत्रें हस्तगत होईपर्यंत महात्मा गांधींनीं सुरू केलेल्या प्रचंड प्रवाहाबरोबर तर-

गणें जरूर होतें. पुढें गांधींच्या कोटी फंडापैकीं जेवढा मोठा तुकडा हातीं येईल तेवढा पाहिजे होता. हें कार्य गुदस्तां आगष्टांत पुरे झालें तेव्हां एकीकडे मुळशी सत्याग्रहाचें बंड व दुसरीकडे अकोल्याचें बंड असे दोन फांटे फुटले. हीं बंडाचीं बीजें तीन चार महिने जमीनींत रुजलीं, व गांधी कैदेंत गेल्याबरोबर जिर्धास्त होऊन रोपडीं बाहेर पडलीं. महाराष्ट्रांतील खरें राजकारण तूर्त तरी टिळकांबरोबर अस्तंगत झालेलें आहे. कांहीं दिवस पूर्ण विश्रांति घेऊन नंतर नव्या नेतृत्वाखालीं व नव्या दमानें तें पुन्हा फोफावेल असें मानण्यास जागा आहे. प्रागतिकांतील स्वार्थपरायणता, राष्ट्रिय पक्षांतील क्षुद्रबुद्धि, व सत्यशोधक मराठ्यांतील ब्रह्मद्वेष, हे तीन्ही रोग सध्यां महाराष्ट्रांत जोरांत आहेत. त्यांचा लवकर नाश होऊन सर्व महाराष्ट्र एकजीव आणि सामर्थ्यवान होईल अशी आपण सर्वांनीं उमेद बाळगली पाहिजे.

आगष्ट १९२२. विविधज्ञानविस्तार.

# प्रबोध माला.

प्रचलित विषयासंबंधानें वेळोवेळीं चर्चा करून लोकमताला योग्य वळण लावणें हें वस्तुतः वर्तमानपत्राच्या संपादकांचें काम आहे. शाळेंत मुलानां शिक्षण देणारे शिक्षक, व लोकांना धर्म ज्ञान देणारे हरदास पुराणिक, तसे राजकीय विषयांत लोकमत बनविणारे गुरू पत्रांचे संपादक होत. पण हल्लींच्या किती संपादकांत हें लोकशिक्षणाचें कार्य करण्याची लायकी आहे हें पाहूं लागलें असतां फार निराशा होते. क्रिस्ती, दासपाल, वानर्जी, मोतीलाल घोस, बाबू अरविंद, लो. टिळक, गोखले, आगरकर यांचे सारख्यानीं विभूषित केलेल्या संपादकीय आसनांवर वाटेल त्या पोटभरूनें नाचून लोकांच्या खिशांतील चार पैसे आपल्या खिशांत ओढावे. अशी स्थिति आल्यानें वर्तमानपत्रही एक दुकानदारी व संपादकी हा पोटाचा रोजगार झाला आहे. एकाद्या प्रसिद्ध पुढाऱ्याचें शिष्यत्व, चुरचुरीत भाषा लिहिण्याची हातोटी आणि लहान मोठ्या

कोणाही व्यक्तीवर तोंड टाकण्याइतकें धाष्टर्य हे तीन गुण असले ह्मणजे तो संपादक बनला. त्यांत प्रत्येक पत्रानें किंवा लेखकानें कोणत्या तरी राजकीय सामाजिक किंवा धार्मिक पक्षाचा शिक्का मारून घेतलाच पाहिजे अशीही एक चाल पडत चालली आहे. त्यामुळें निःपक्षपात बुद्धीनें हरएक प्रश्नाची चर्चा अलीकडे दुर्मिळ होत चालली आहे. राष्ट्राचें राजकारण शुद्ध आणि जिवन्त ठेवण्याला अशा चर्चेची फारच जरूरी असते. पक्षविपक्षांच्या घासाघाशींत सत्याची ओढांताण होऊं नये सर्वांचे गुणदोष दाखवून सर्व पक्षांच्या मतांतील चिरस्थायी व ग्राह्य अंश वेगळा काढणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यन्त आवश्यक आहे. व हें कार्य करण्याकरितांच प्रस्तुत माला सुरू केली आहे. प्रचलित राजकारणांतील एककल्लीपणाचे दोष दाखवून प्रत्येकास स्वतः स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय लावणें हा या प्रबोध मालेचा मुख्य उद्देश आहे. लेखकाचें मत काय ह्मणून सवाल करणारानां एवढेंच उत्तर कीं तुह्मी दुसऱ्याचें मत उसनें घेण्याची संवय टाकून देऊन प्रस्तुत लेखांतील प्रत्येक मुद्याचें नीट मनन करून स्वतःचें मत

बनवावें, व तें जरी कदाचित् चुकलें तरी ती चूक स्वतःचे विचारानेंच दुरुस्त करण्याची उमेद बाळगावी. उसन्याकर्जाप्रमाणेंच दुसऱ्याचीं उसनी मतें कधीं लाभदायक होत नाहींत. टिळक गांधी मेथा दादाभाई हे नुसते मार्गदर्शक समजावे. पण त्यानीं दाखविलेल्या मार्गांत स्वतःच्या पायानीं चालण्याची संवय प्रत्येकानें केली पाहिजे.

राजकारणांत स्वतंत्र आणि निर्विकार बुद्धीनें विचार करण्याची पद्धती अंमलांत यावी या हेतूनेंच कोणत्याही पक्षाभिविविष्ट वर्तमानपत्राचा आश्रय न करतां स्वतंत्र मालारूपानें हें प्रबोधन आरंभलें आहे. याचे किती पडे येतील हें आज सांगतां येत नाहीं. पहिल्या पुष्पांत उजळणीच्या रूपानें वस्तुस्थितीचें समालोचन केलें आहे. दुसऱ्यांत राजकारणांतील भिन्नपक्षांचे वर्णन येऊन तिसऱ्यांत ग्राह्य व त्यांत दोन्ही अंश दाखवावयाचे असल्यानें लेखांतील निरनिराळे भाग सर्व पक्षांनां अप्रिय होण्याचा संभव आहे पण हा स्वरूपनिदर्शनाचा आरसा आहे, त्यावर रागावण्यापेक्षां आपआपलीं रूपें सुधारणें अधिक श्रेयस्कर आहे असा

प्रत्येकानें विचार केला पाहिजे. लेखकाचीं मतें विचार घ्यापेक्षां स्वतःच्या मतांचे शुद्धीकरण करण्याकडे जर सर्व वाचकांचे लक्ष लागेल तर या मालेचा हेतु सफल झाला असें मानलें जाईल. लोकांना हालवून जागें केल्याचें श्रेय लेखकास मिळेल तर आणखी काय पाहिजे ?

वस्तुतः राजकारण हें कठीण शास्त्र आहे. इतर विषयांचा अभ्यास केल्याशिवाय बोलण्याचा अधिकार कोणास येत नाहीं. पण राजकारणांत वाटेल त्या अनधिकारी माणसानें घुसावें, ही स्थिति राष्ट्राच्या प्रगतीला इष्ट नाहीं. हिंदुस्थानच्या राजकारणाचा अभ्यास पद्धतशीर रीतीनें करून पुरेसें ज्ञान व अनुभव मिळाल्यानन्तर लोकांचे पुढारी होण्याची हांव तरुण पिढीनें धरली पाहिजे. अशा प्रकारची जिज्ञासा उत्पन्न करणें हाच या " प्रबोध माले"चा मुख्य उद्देश आहे.

---

2224

REFBK-0002224

प्रत्येकानें विचार केला पाहिजे. लेखकाचीं मतें विचार-
ण्यापेक्षां स्वतःच्या मतांचे शुद्धीकरण करण्याकडे जर सर्व वाचकांचे लक्ष लागेल तर या मालेचा हेतु सफल झाला असें मानलें जाईल. लोकांना हालवून जागें केल्याचें श्रेय लेखकास मिळेल तर आणखी काय पाहिजे ?

वस्तुतः राजकारण हें कठीण शास्त्र आहे. इतर विषयांचा अभ्यास केल्याशिवाय बोलण्याचा अधिकार कोणास येत नाहीं. पण राजकारणांत वाटेल त्या अनधिकारी माणसानें घुसावें, ही स्थिति राष्ट्राच्या प्रगतीला इष्ट नाहीं. हिंदुस्थानच्या राजकारणाचा अभ्यास पद्धतशीर रीतीनें करून पुरेसें ज्ञान व अनुभव मिळाल्यानन्तर लोकांचे पुढारी होण्याची हांव तरुण पिढीनें धरली पाहिजे. अशा प्रकारची जिज्ञासा उत्पन्न करणें हाच या "प्रबोध माले"चा मुख्य उद्देश आहे.

मुद्रक—काशिनाथ यशवंत माने,
" स्टँडर्ड प्रेस " ७३-७५, १ ली, सुतार गली,
मुंबई, नं. ४.

प्रकाशक—नरहर रामचंद्र जोशी,
" सुदर्शन " ऑफीस, खेतवाडी, मुंबई, नं. ४.